**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०९८ दि. २६ /०९ /२०१९**

प्रेस नोट दि.२६/०९/२०१९

दत्तवाडी पोलीसांनी निर्मान झालेल्या पुरसदृश्य परिस्थितीमध्ये वाचविले नागरिकांचे प्राण

दि.२५/०९/२०१९ रोजी संपुर्ण पुणेशहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसाने संपुर्ण शहराने आहाकार उढवुन दिला.साधारण रात्रौ ८/०० च्या पुढे जसा पावसाचा जोर वाढुलागला तसे घरात पाणि शिरले लाईट गेली आहे.आमच्या घरात वयसकर लोक अढकुन पडले आहेत.या करीता पोलीस मदत द्या असे मदती करीता दत्तवाडी पोलीस स्टेशन व नियत्रंण कक्ष येथे फोन येवु लागले.त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी एकत्र बोलावुन कशा पध्दतीने या पुरसदृश्य परिस्थिती मध्ये अडकलेल्या लोंकाना बाहेर काडता येईल यांचे नियोजन करुन वेगवेगळ्या टिम तयार केल्या पोलीस स्टेशन मधुन सर्व जण आपआपल्या दिलेल्या भागात गेले.संपुर्ण रस्त्यावर पाणि असल्यामुळे कोणतेच वाहन रस्त्यावरुन चालणे शक्य नव्हते.अशा परिस्थितीमध्ये,दत्तवाडी म्हसोबा चौक,दांडेकर पुल,सर्वे नं १३३,आंबिल ओढा वसाहत,सहकारनगर मधील आण्णाभाऊ साठे वसाहत,आंबेडकर वसाहत,या परिसरात अडकलेल्या लोकानां सुरक्षित पणे बाहेर काढले अनेक ठिकाणी कंबरेच्या वर पाणि साठलेले असल्यामुळे घरामध्ये अडकुन पडलेल्या वयसकर नागरिकाना घराच्या बाहेर पडता येत नव्हते.अशा नागरिकाना पोलीसांनी आपल्या पाठिवर घेवुन पुर्ण अंधाऱ्या ठिकाणाहुन केवळ बॅटरीच्या प्रकाशात बाहेर काढले.अनेक नागरिकाच्या गाड्या वाहुन जात असताना स्थानिक नागरिकाच्या मदतीने बाहेर काढल्या व वाचविल्या.गजानन महाराज मठ परिसरात वाघजाई टेकडी कडुन येणाऱ्या पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने रस्त्यावरील संपुर्ण वाहतुक ठप्प झाली होती.आजुबाजुच्या दुकानामध्ये पाणि शिरले होते.रस्त्यावर लाईट नसल्यामुळे काळोखामध्ये समोरील काही दिसत नव्हते.तेवढ्यात एक वयसकर माणुस पाण्याच्या प्रवाहातुन वाहुन चालला असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे,सहा पो निरीक्षक शंकर सलगर,पो ना ज्ञानेश्वर वगरे,यांना दिसले.त्याला वाचवण्याकरीता सर्वानी पुढे आपआपल्या परिने त्यांला वाचविले.त्यांदरम्यान त्या व्यक्तीस बाहेर काढत असताना शंकर सलगर यांचा तोल गेल्यामुळे ते पाण्यात पडले.त्यांना देविदास घेवारे यांनी वाचविले.संपुर्ण रात्रभर लाईट नसल्यामुळे लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात भिती निर्मान झाली होती.अनेक लोंक घाबरुन घराच्या बाहेर येवुन थांबले होते.त्या लोकांना सर्व पोलीस अधिकारी व स्टाफ यांनी देविदास घेवारे यांच्या समवेत पाई फिरुन दिलासा दिला अशाप्रकारे नियोजन केल्यामुळे पुरसदृश्य परिस्थितीमध्ये दांडेकर पुल सहकारनगर,व इतर भागात अडकलेल्या लोकांना व त्यांच्या वाहनाना वाचविण्यात मोठ्या प्रमाणात पोलीसांना मदत झालेली आहे.नागरिकांनी सुध्दा पोलीसानी केलेल्या मदत कार्याचे कौतुक केले आहे.

या संपुर्ण मोहीमेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे,सहा पो निरीक्षक शंकर सलगर,पो ना ज्ञानेश्वर वगरे,कुलदिप संकपाळ,पो हवा तानाजी निकम,सुधीर घोटकुले,दिलीप पिलाने,गणेश शिंदे,इर फान तडवी,गणेश कांबळे,सतीश भारती,किशोर ढमढेरे,कुणाल माने,शरद राऊत,राहुल ओलेकर,आदिनाथ देवकर,निलेश बोडके,प्रविण पिसाळ,विकास कदम,अमित बोडरे,प्रमोद भोसले,महेश चौगुले,सुजित अहिवळे,यांनी विशेष सहभाग घेतला.कमरेभर पाण्यात उतरुन नागरिकांना बाहेर काढल्या मुळे अनेक नागरिकाचे प्राण वाचविता आले.

देविदास घेवारे
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे